महाराष्ट्र शासन
परिवहन आयुक्त कार्यालय
प्रशासकीय इमारत, ४ था मजला,
डॉ. आंबेडकर उद्याना जवळ,
शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व) मुंबई - ४०० ०५१.
दूरध्वनी क्रमांक : ०२२-२०८६३४०६ ई-मेल आयडी : dytcinspect.tpt-mh@gov.in

क्र. पआका/बायोमॅट्रीक/निरीक्षण/का१०/२०२६/जा.क्र. ३२६१ दिनांक :- 14 AUG 2026

प्रसिध्दीपत्रक

परिवहन आयुक्त कार्यालयातील कार्यालयीन कर्मचा-यांची उपस्थिती नोंदवण्यासाठी **Essl १४ GB Ram Embaded Linux Based Time Attendance २** बायोमॅट्रीक यंत्रणा कार्यरत आहे. सदर यंत्रणेचा वार्षिक देखभाल दुरुस्ती सेवा संविदा करार करण्यासाठी विविध सेवापुरवठादारांकडून (जीएसटीसह) दरपत्रके मागविण्यात येत आहेत.

सदर वार्षिक देखभाल/दुरुस्ती दर कराराच्या अटी व शर्ती खालीलप्रमाणे आहेत.

१) सदर यंत्रणा अविरत व सुस्थितीत ठेवण्याची संपुर्ण जबाबदारी दरपत्रक मंजूर झालेल्या कंपनीची राहील.

२) देखभाल/दुरुस्ती करिता कार्यालयास नियमीत भेटी देणे आवश्यक राहील.

३) करार कालावधीस ३ महिने पुर्ण झाल्यावर व काम समाधानकारक झाल्यावर देयकाची प्रतिपुर्ती विहित पध्दतीने करण्यात येईल.

४) यंत्रणा दुरुस्तीसाठी उक्त यंत्रणेच्या सुट्या भागाचा दर्जा उच्च/ आयएसआय मार्क असेल व ते तातडीने उपलब्ध करून यंत्रणा विनाविलंब कार्यरत होईल याची दक्षता घ्यावी.

५) करार कालावधीमध्ये सेवा असमाधानकारक आढळल्यास देखभाल/ दुरुस्ती दर करार रद्द करण्याचे अधिकार या कार्यालयास राहतील.

६) भविष्यात आवश्यकतेनुसार काही अटी व शर्ती करारामध्ये समाविष्ट करावयाचे झाल्यास किंवा करार रद्द करावयाचा असल्यास तसे करण्याचा अधिकार या कार्यालयास राहील.

७) करार कालावधीमध्ये दरात कोणतेही बदल कंपनीस करता येणार नाही.

८) या कार्यालयाशी केलेला करार मध्येच खंडीत करता येणार नाही.

९) यंत्रणेच्या देखभाल व दुरुस्ती संबंधी अडचण उद्भवल्यास कंपनीच्या नियुक्त प्रतिनिधीने त्यांच्या संपर्क क्र./ भ्रमणध्वनीवर सदैव उपलब्ध रहाणे व आलेल्या अडचणींचे तात्काळ निराकरण करणे बंधनकारक राहील.

वरील सर्व अटी व शर्ती विचारात घेऊन सदर यंत्रणा वार्षिक देखभाल/दुरुस्ती करार करण्याबाबतचे दरपत्रक विहित नमून्यात दिनांक १३/०८/२०२६ रोजी सायंकाळी ०६:१५ वाजेपर्यंत (शासकीय सुट्टया सोडून) मोहोरबंद लिफाफ्यात परिवहन आयुक्त कार्यालय, प्रशासकीय इमारत, ४ था मजला, डॉ. आंबेडकर उद्याना जवळ, शासकीय वसाहत, वांद्रे (पूर्व) मुंबई - ४०००५१, येथे पाठवावे किंवा प्रत्यक्ष जमा करावेत. मुदतीनंतर आलेली दरपत्रके स्विकारण्यात येणार नाहीत, याची कृपया नोंद घ्यावी.

(कैलास कोठावदे)
उप प्रादेशिक परिवहन अधिकारी (निरीक्षण)
महाराष्ट्र राज्य, मुंबई

C:\Users\Dell\Desktop\BEINGTIGER\Beingtiger\PRASHANT\BIO\Biometric.docx

Scanned with OKEN Scanner